## रे. दिवाणी मुकदमा नं.९७/२०१७ मधील नि.३९ वरील आदेश
## (शशिकांत हिंदुराव कुराडे वि. हिंदुराव बाबुराव कुराडे वगैरे)
## (CNR:MHSN12000785-2017)

१. वादी यांनी प्रतिवादी क्र.२ चे वारसांना रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४(१) तसेच आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप आणि कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामधील प्रतिवादी क्र.२ सुशिला हिंदुराव कुराडे या दिनांक २७/१०/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी नं.२ यांना वादी व प्रतिवादी नं. १, ३ व ४ हे वारस असून ते यापूर्वीच प्रस्तुत दाव्यामध्ये सामील आहेत.

३. सबब प्रतिवादी क्र.२ यांना वादी व प्रतिवादी नं. १, ३ व ४ हे वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सदर वारस हे या दाव्याचे कामी सामील आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा रेकॉर्डवर घेणेची आवश्यकता नाही. सबब याकामी वादी यांनी केवळ प्रतिवादी नं. २ यांचे नावासमोर ''(मयत) तर्फे वारस वादी व प्रतिवादी नं. १, ३ व ४'' असे लिहिणेस व त्या खालील ''वय वर्षे ६०, धंदा शेती, रा. अंकलखोप, ता. पलूस, जि. सांगली'' हा मजकूर वगळणेस व त्याप्रमाणे नि. १ कडील दावेमध्ये दुरुस्ती करणेस मे. कोर्टाची परवानगी असावी अशी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही. सबब त्यांचेविरुध्द सदरचा अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

५. वादी यांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादी यांनी वरील प्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी

मागितली आहे. सदर मयत प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यु दाखल्याची झेरॉक्सप्रत वादीतर्फे नि.४१/१ वर दाखल केलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दि.२७/१०/२०२१ रोजी झालेला आहे. दाव्यामध्ये अशा प्रकारे दुरुस्ती मंजूर केली असता त्यामुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती केल्यामुळे मुळ दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती जर नामंजूर केली तर वादी यांचे कधीही पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरची दुरुस्ती जर मंजूर केली तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा नि.३९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत नि.३९ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दावा दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादींसाठी पुढील तारखेस हजर करावी.

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–२६/०९/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 26/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 26/09/2022 |
| Uploaded on | : | 28/09/2022 |